# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping people in distress situation**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **10/10/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. वाशीम शहर हद्दीत 'ईद-ए-मिलाद'निमित्त निघालेल्या मिरवणुकी दरम्यान आलेल्या रुग्णवाहिकेला मुस्लिम बांधवांनी मिरवणूक थांबून मोकळी वाट करून देत सामाजिक बांधिलकी जोपासली.

लोकमत



## मिरवणूक थांबवून रुग्णवाहिकेला दिली वाट

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : इस्लामचे अंतिम पैगंबर हजरत मुहम्मद यांची जयंती ईद-ए-मिलादनिमित्त वाशिम शहरात रविवारी सकाळी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान पाटणी चौकात एक रुग्णवाहिका सायरन वाजवत रिसोडकडे जात असल्याचे लक्षात येताच मुस्लीम बांधवांनी मिरवणूक थांबवत सहभागी बांधवांना एका बाजूला केले. त्यामुळे काही क्षणात रुग्णवाहिकेला वाट मिळाली.

जुलूस-ए-मुहम्मदीची भव्य मिरवणूक वाशिम शहरातून रविवार, ९ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली. ईद-ए-मिलाद हा सण मुस्लीम बांधवांकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. दरवर्षी यानिमित्ताने मशिदींसह घरे, दुकाने व परिसरात सजावट करण्यात येते. मागील आठवडाभरापासून शहरातील मुस्लीम बांधवांकडून लगबग पाहावयास मिळत होती. रविवारी सकाळी वाशिमात मुस्लीम बांधवांनी मिरवणुकीला सुरुवात केली होती. दुपारी १२ वाजेदरम्यान पाटणी चौकात मिरवणूक आली. मिरवणुकीदरम्यान पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. पोलिसांकडून वाहने एका बाजूने चालविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. मात्र वाहनांची संख्या आणि वाहनचालकांच्या घाईमुळे वाहतूक कोंडी पाहावयास मिळाली. अशातच आलेली रुग्णवाहिका वाहतूक कोंडीत अडकणार नाही, याची दक्षता घेत मुस्लीम बांधवांनी रुग्णवाहिकेला वाट मिळावी, यासाठी तत्काळ मिरवणुकीतील नागरिकांना सूचना केल्या. काहीजणांनी मानवी साखळी तयार करत रुग्णवाहिकेला वाट करून दिली. सामाजिक बांधिलकी जपत मुस्लीम बांधवांनी वाट करून दिल्याने रुग्णवाहिका विनाविलंब मार्गस्थ झाली.